RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक २८] शुक्रवार, फेब्रुवारी २०, २०२६/फाल्गुन १, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १११**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक न्यास्थाप-०३२५/२६९/प्र.क्र.६९/कार्यासन-११.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलम २१, २२अ व २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, आणि त्याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय, अहमदनगर यास दुय्यम असलेल्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), संगमनेर यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ पासून,—

(क) अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे जिल्हा न्यायालय, अहमदनगर यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय असेल;

(ख) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे, उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील आणि ते अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे त्यांचे न्यायालय भरवतील; आणि

(ग) अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोले यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले या महसुली तालुक्याच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांचा समावेश असेल आणि सदर क्षेत्रे, जी यापूर्वी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), संगमनेर यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट होती ती उक्त क्षेत्रे त्यामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास वसंत गायकवाड,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.



Part IV-A, Ex. No. 111.indd 1 2/21/2026 3:22:10 PM

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 20th February, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. Nyasthap-0325/269/C.R.69/DESK-11.— In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Sangamner, sub-ordinate to the District Court, Ahmednagar, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from 22nd February, 2026, —

(a) there shall be a Civil Court at Akole, sub-ordinate to the District Court, Ahmednagar in Ahilyanagar District;

(b) the said Court shall be presided over by the Civil Judge (Senior Division) who shall hold his Court at Akole; and

(c) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge (Senior Division), Akole, in Ahilyanagar District shall comprise the areas covered within the local limits of the revenue tehsil of Akole in Ahilyanagar District and work from the said tehsil, which was heretofore included within the local limits of the ordinary and special jurisdiction of the Civil Judge (Senior Division), Sangamner in Ahilyanagar District shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor-*cum*- Joint Secretary to
Government.

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६.

### अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक न्यास्थाप-०३२५/२६९/प्र.क्र.६९/कार्यासन-११.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत, यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले या महसुली तालुक्याशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ पासून, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) या अन्वये स्थापन केलेल्या व अस्तित्वात असलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोले यांच्या न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, उक्त अधिनियमान्वये निर्णय करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत अधिकारिता असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोले यांचे न्यायालय विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास वसंत गायकवाड,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 20th February 2026.

*NOTIFICATION*

HINDU MARRIAGE ACT, 1955.

No. Nyasthap-0325/269/C.R.69/DESK-11.— In exercise of the powers conferred by clause (b) of section 3 of the Hindu Marriage Act, 1955 (25 of 1955), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all the earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the revenue tehsil of Akole, in Ahilyanagar District, the Government of Maharashtra, hereby, with effect from 22nd February, 2026, specifies, the Court of Civil Judge (Senior Division) at Akole, in Ahilyanagar District as having jurisdiction in respect of the matters to be dealt with under the said Act, within the local limits of ordinary jurisdiction of the existing Court of Civil Judge (Junior Division), Akole, established under the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.